# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 08/10/2020 (गुरूवार)

(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावर मौजा भोजापुर शिवार येथे दिनांक 04/10/2020 चे 12.30 वा. ते दिनांक 05/10/2020 चे 18.30 वा. दरम्यान मृतक नामे– अल्ताफ अली हसन अली कुरेशी, वय 34 वर्ष, रा. मोमीनपुरा नागपुर हे त्यांच्या एमएच–49 बीजे 4081 क्रमांकाच्या मोटरसायकलने रोख रक्कम 2,07,000/– रू. व व्हीओ कंपनीचा मोबाईल किं. 6,000/–रू. सोबत घेवुन मेंढया खरेदी करण्याकरीता गेले असता अज्ञात आरोपीने त्यांचे जवळील नगदी 2,07,000/– रु. व मोबाईल किं 6,000/–रू. असा एकुण 2,13,000/– रू. चा मुददेमाल हिसकावुन त्यांचे डोक्यावर व शरीरावर जबर मारहाण करून त्यांना जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– फैयाज कुरेशी सैय्यद हसन अली कुरेशी, वय 38 वर्ष, रा. मोमीनपुरा नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 302, 394, 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. परघने 7720952399 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 08 किमी अंतरावर मौजा दहेगाव जोशी येथे दिनांक 07/10/2020 चे 07.30 वा. ते 08.00 वा. दरम्यान एमएच–40/बीएम–1675 क्रमांकाचा ट्रक्टर व एमएच–40/एएम–2557 क्रमांकाची ट्रालीचा चालक आरोपी नामे– मुकेश उर्फ प्रमोद मोरेश्वर, वय 32 वर्ष, रा. दहेगाव जोशी याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 3,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 7,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक संदीप कडु यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री उबाळे 8830332007 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर